# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १३९
## सभावृत्तांत

दिनांक :- ०३.११.२००९ वेळ :- दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक ०३.११.२००९ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.साळुंखे सुरेखा मारुती
५. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
६. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
८. मा.जगदीश शंकर शेट्टी
९. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
१०. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
११. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
१२. मा.रामदास तानाजी कुंभार
१३. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१४. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.झुरे,मा.सावंत,मा.गायकवाड, मा.गावडे,मा.फडणीस,मा.भोसेकर,मा.गायकवाड,मा.मुंढे-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.उगिले-शहर अभियंता,मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.पाटिल-उप संचालक(नगररचना),मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.सुरगुडे-विकासअभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक, मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.ढगे,मा.कपिले,मा.पाटिल, मा.जाधव,मा.कुदळे,मा.निकम,मा.चव्हाण,मा.दुधेकर,मा.सवणे,मा.ठुबे,मा.इंगळे-कार्य. अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी(माध्य.),मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले -

विषय क्रमांक ४३) स्थापत्य उद्यान विभागातील अंदाजपत्रकातील उद्याने या लेखाशिर्षावरील तरतुद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक ४४) अ,ब,क,ड प्रभागात आधार केंद्र/नागरी सुविधा केंद्र उभारणे बाबत - मा.भाऊसाहेब सुपे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४५) श्रीमान मोरया गोसावी यांचा संजीवन समाधी सोहळा व खंडोबा महाराज महोत्सवासाठी व्यवस्था करणेबाबत-मा.भाऊसाहेब सुपे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४६) मानधन अदा करणेबाबत - मा.जगदीश शेट्टी,मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४७) भोसरी स.न.६९५ मधील बाह्यरुग्ण इमारतीचे विस्तारीकरण करणेचे काम हे चोविसावाडी येथे व्यायामशाळा बांधणे येथे करणेबाबत - मा.रामदास कुंभार, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४८) मानधनावर घेणेबाबत - मा.भाऊसाहेब सुपे, मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ४९) सुनेत्रा महिला बचत गटास प्रकल्प खर्चाची रक्कम अदा करणे बाबत - मा.जगदीश शेट्टी,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५०) मोकाट कुत्री व जनावरे पकडण्याचे काम मे.स्मार्ट मॅनेजमेंट ॲण्ड सर्व्हिसेस यांना देणेबाबत - मा.नितीन ओव्हाळ, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५१) विद्युत रोषणाईबाबत - मा.जितेंद्र ननावरे,मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५२) लिंकरोड येथील मुस्लीम दफनभूमी देखभाल, संरक्षण व चालनकामी चालविणेस देणेबाबत-मा.जगदीश शेट्टी, मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक ५३) सन २००९-१० करीता दिवाळीअंक खरेदी करणेबाबत...

विषय क्रमांक ५४) महिला बालकल्याण विभागातील योजना राबविणेबाबत - मा.प्रशांत शितोळे, मा.गणेश भोंडवे यांचा प्रस्ताव...

---------------

दिनांक २७.१०.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १३८)सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- ९५२२ विषय क्रमांक :- १
दिनांक - ३.११.२००९
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-१) मा.बाबु नायर, मा.विजया जाधव यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१२
विषय :- व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५२३ विषय क्रमांक :- २
दिनांक - ३.११.२००९
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-१) मा.विजया जाधव, मा.बाबु नायर यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक २४/८/२००९ ठराव क्र.१३
विषय :- व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५२४ विषय क्रमांक :- ३
दिनांक - ३.११.२००९ विभाग- वाहनदुरुस्ती कार्यशाळा
सुचक - मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/१/कावि/५६२/०९
दि.२७/०८/२००९
विषय:- मनपाचे पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाचे वापराकरीता दोन जेटींग यंत्रणा व दोन नग जेटींग कम सक्शन यंत्रणा खरेदीबाबत...

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५२५ विषय क्रमांक :- ४
दिनांक - ३.११.२००९ विभाग -स्थापत्य
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३६३/०९
दि. ३१/०८/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.९४ अन्वये, पिंपरी वाघेरे प्रभाग क्र.७३ मधिल यशवंतराव चव्हाण स्टेडियमचे दुरुस्ती, नुतनीकरण व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस (नि.र.रू. ४६,४३,२५६/- [र.रू.शेहचाळीस लाख त्रेचाळीस हजार दोनशे छपन्न] पेक्षा ००.५० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेण्यास तसेच निविदा अटीनुसार निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही

मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ९५२६ | विषय क्रमांक :- ५ |
| दिनांक - ३.११.२००९ | विभाग - मध्यवर्ती औषध भांडार |
| सुचक- मा.सुरेखा साळुंखे | अनुमोदक- मा.राजेश पिल्ले |

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मऔभां/१/कावि/२०३/०९ दि.५/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

दवाखाने/रुग्णालयांची सध्याची आवश्यक मागणी लक्षात घेऊन पुढील पुरवठा आदेश द्यावे लागणार असुन STP कडून E-Tendering पद्धतीने औषधे/साहित्य निविदा प्रक्रिया Demo पूर्ण होऊन निविदाधारकांना दर भरणेसाठी १५ ते २१ दिवस मुदत द्यावी लागणार असल्याने STP कडून २९/९/२००९ रोजी Demo होऊन निविदा प्रसिद्धी करणे Finalise झालेस संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑक्टोबर २००९ अखेर पुर्ण होईल तोपर्यंत दवाखाने/ रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या औषधे/साहित्य खरेदीकामी र.रु.१,५०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ९५२७ | विषय क्रमांक :- ६ |
| दिनांक - ३.११.२००९ | विभाग - प्रशासन |
| सुचक- मा.गणेश भोंडवे | अनुमोदक- मा.सुलोचना बढे |

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/६/कावि/५३९/०९ दि. ८/१०/२००९

विषय :- श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ - कचराकुली यांना सेवेतुन काढुन टाकणेबाबत..

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ९५२८ | विषय क्रमांक :- ७ |
| दिनांक - ३.११.२००९ | विभाग - विद्युत ब प्रभाग |
| सुचक- मा.जगदीश शेट्टी | अनुमोदक- मा.निर्मला कदम |

संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/९८१/०९दि.२२/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

ब प्रभागांतर्गत वॉर्ड क्र.५७ मधील किवळेगाव रस्त्यावरील लघुदाब पोल व तारा हलविणे या कामाकरीता २००९-१० चे अंदाजपत्रकात पानांक ४९१ अ क्र.३ वर [नि.नोटीस क्र.३/८ ०८-०९] एकुण रक्कम रु.१० लाख इतकी तरतुद करणेत आली असली तरी सदरचे काम पुढील आर्थिक वर्षात करावयाचे असल्याने सदर कामाकरीताच्या र.रु.१० लाख रुपये तरतुदमधुन रक्कम रुपये ७ लाख तरतुद ब प्रभागाअंतर्गत वॉर्ड क्र.६२ मधील दळवीनगर, भोईरनगर या भागातील रस्ता

रुंदीकरणातील व शहर सुशोभिकरण अंतर्गत लघुदाब पोल व तारा हलविणे (नि.नोटीस क्र.३/४ ०८-०९) या कामाकरीता वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. त्याव्यतिरीक्त महापालिकेच्या सन २००९/१० चे अंदाजपत्रकात प्रपत्र अ प्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५२९ विषय क्रमांक :- ८
दिनांक - ३.११.२००९ विभाग - झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपु/८/कावि/५०२/०९ दि.२२/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

BRT रुट नं.१ व २ जगताप डेअरी ते नाशिक फाटा व काळेवाडी फाटा ते देहुरोड या नियोजित मार्गामधील सर्व्हेक्षण व त्याचा अहवाल या कामासाठी श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी यांची निविदा न मागविता करारनामा न करता नेमणुक करणेस व याकामी होणाऱ्या र.रु.२,००,०००/- [र.रू.दोन लाख] खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३० विषय क्रमांक :- ९
दिनांक - ३.११.२००९ विभाग - विद्युत भुगयो
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/१६४/०९ दि. २३/१०/२००९
विषय :- विद्युत भुगयो विभागाकरीताच्या कामांकरीता प्रपत्र ब नुसार वर्गीकरण करणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३१ विषय क्रमांक :- १०
दिनांक - ३.११.२००९ विभाग - विद्युत मुख्य कार्यालय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/नि/१अ/कावि/२२२/०९ दि. २२/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या विद्युत विभागा कडील नि.नो.क्र.३/०८/०९ मधील अ.क्र.४ अन्वये, प्र.क्र.३२ (नविन वॉर्ड क्र.६२) मधील दळवीनगर,भोईरनगर, भोईरनगर भागातील रस्ता रुंदीकरणातील व शहर सुशोभिकरण अंतर्गत लघुदाब पोल व तारा हलविणेकामी मे.सुमी इलेक्ट्रीकल्स् सर्व्हिसेस [नि.र.रु.४६,४०,११७/- (सेहेचाळीस

लाख चाळीस हजार एकशे सतरा) पेक्षा ३० % जास्त (स्विकृतीयोग्य दरापेक्षा ११.४० % कमी] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५३२ विषय क्रमांक :- ११
दिनांक - ३.११.२००९ विभाग - विद्युत मुख्य कार्यालय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/नि/१अ/कावि/२२१/०९ दि. २२/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.४/०९/१० मधील अ.क्र.१६ अन्वये, अ प्रभागाअंतर्गत वॉर्ड क्र.३७ चिंचवड स्टेशनमधील स्ट्रीटलाईट दिव्यांचे नुतनीकरण करणेकामी मे.सुमी इलेक्ट्रीकल सर्व्हिसेस [नि.र.रु.८२,१५,४९४/- (ब्याऐंशी लाख पंधरा हजार चारशे चौऱ्याण्णव) पेक्षा ३६.३६% कमी] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५३३ विषय क्रमांक :- १२
दिनांक - ३.११.२००९ विभाग -स्थापत्य
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/वा.क/९३२/०९दि.२६/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पिंपरी चिंचवड शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतूक सुरक्षिततेसाठी झेब्रा पेंटींग, रोड मार्कींग इ. कामे करणेकामी कामाची निकड पाहता मे.हर्षद शेख यांच्याकडून अंदाजपत्रकिय दराच्या १०% कमी दराने थेट पद्धतीने करुन घेणेस व निवीदा न मागविता थेट पद्धतीने काम करण्यासाठी करारनामा करणेस व सदर कामाकरिता अं.र.रु.१०,००,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५३४ विषय क्रमांक :- १३
दिनांक - ३.११.२००९ विभाग -स्थापत्य
सुचक- मा.भाउसाहेब सुपे अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/१अ/कावि/१२६/०९ दि. २६/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२००७-०८ मधील अ.क्र.१६४ अन्वये, आकुर्डी वॉर्ड क्र.५२ येथे रुपेश कॉलनी साईपूजा बाग येथील रस्ते डब्यू.बी.एम. व हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन कं. [अंदाजपत्रकीय दर] या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.४४,३८,९७२/- [र.रू. चव्वेचाळीस लाख अडोतीस हजार नऊशे बहात्तर] पर्यंत

काम करून घेण्यास तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३५ विषय क्रमांक :- १४
दिनांक - ३.११.२००९ विभाग -स्थापत्य
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अस्था/१/कावि/१२६०/०९
दि. २६/१०/२०१०
विषय : श्री.भुमकर एस.एन.. सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त यांची वाहतुक तांत्रिक सल्लागार म्हणुन नेमणुक करणेबाबत...

विषय क्रमांक १४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३६ विषय क्रमांक :- १५
दिनांक - ३.११.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/३/कावि/५२९/०९
दि. २६/१०/२००९
विषय : निविदा नोटिस क्र.४/२००८-०९ ड प्रभाग वॉर्ड क्र.८९ चा करारनामा करणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३७ विषय क्रमांक :- १६
दिनांक - ३.११.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/३/कावि/५४८/०९
दि. २६/१०/२००९
विषय : निविदा नोटिस क्र.४/२००८-०९ ड प्रभाग वॉर्ड क्र.८२ चा करारनामा करणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३८ विषय क्रमांक :- १७
दिनांक - ३.११.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/६/कावि/५३०/०९
दि. २६/१०/२००९
विषय : निविदा नोटिस क्र.४/२००८-०९ ड प्रभाग वॉर्ड क्र.७७ चा करारनामा करणेस व खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५३९ विषय क्रमांक :- १८
दिनांक - ३.११.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/७/कावि/४५२/०९दि.२६/१०/०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, अ प्रभाग वॉर्ड क्र.५ मोरेवस्ती या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.भैरवनाथ स्वयं.सेवा सह. संस्था [निविदा रकमेच्या ७ % कमी एकुण र.रू.१३,७५,०५७/- [र.रू.तेरा लाख पंच्याहत्तर हजार सत्तावन्न] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (नि.र.रू.१४,७८,५५६/-)
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४० विषय क्रमांक :- १९
दिनांक - ३.११.२००९ विभाग - आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/४/कावि/४५३/०९दि.२६/१०/०९
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मनपाच्या आरोग्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२००८-०९ अन्वये, क प्रभाग वॉर्ड क्र.१७ सॅडविक कॉलनी या ठिकाणाचे साफसफाई कामी मे.स्वामी विवेकानंद स्वयं.सेवा सह. संस्था मर्या. [निविदा रकमेच्या ११ % कमी एकुण र.रू.९,३२,०४९/- [र.रू.नऊ लाख बत्तीस हजार एकोणपन्नास] ] यांचेशी कामाचा करारनामा करणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.(नि.र.रू.१०,४७,२४६/-)
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४१ विषय क्रमांक :- २०
दिनांक - ३.११.२००९ विभाग - प्रशासन
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१२६६/०९दि.२६/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६८ (२) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम १५१ (४) व इतर अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांच्या वतीने कामकाज/कर्तव्ये पार पाडण्यासाठी आयुक्त यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास व आयुक्त यांना योग्य वाटेल अशा अधिकाऱ्याकडे विषयांकित नमुद केलेले अधिकार वेळोवेळी प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४२ विषय क्रमांक :- २१
दिनांक - ३.११.२००९ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/२१७/०९ दि.२६/१०/२००९
विषय :- मनपाचे माध्यमिक शिक्षण विभागासाठी डयुल डेक्स (बेंच) खरेदी करणेबाबत..

विषय क्रमांक २१ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४३ विषय क्रमांक :- २२
दिनांक - ३.११.२००९ विभाग - संगणक
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/१०/कावि/२८३/०९ दि.२६/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

National Mission Mode Project for E-Governance in Municipalities या प्रकल्पांतर्गत म.न.पा.चे विविध विभागांचे संगणकीकरण करणेकामी Software तयार करणेकामीचे Request For Proposal (RFP) चे निविदा प्रसिद्धीचे जाहिरात बीलाचेपोटी संबंधीत वृत्तपत्र दै.टाईम्स ऑफ इंडिया,पुणे, दै.इकोनॉमिक टाईम्स मुंबई, दै.लोकमत पुणे यांना अदा करावयाची एकूण रक्कम रुपये १,०८,१४०/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४४ विषय क्रमांक :- २३
दिनांक - ३.११.२००९ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/निविदा/कावि/८०१/०९ दि.२६/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

मा.आयुक्त यांचे कार्यालयासाठी खरेदी करण्यात आलेला प्रिंटर नादुरुस्त झाल्याने मे.भुमिका इंफोटेक यांचेकडून स्पेअरपार्ट खरेदी करून सदर प्रिंटर चालु करून दिला असल्याने स्पेअरपार्ट खरेदी कामीच्या र.रु.१८,०००/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४५ विषय क्रमांक :- २४
दिनांक - ३.११.२००९ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/०४/कावि/४६०/०९
दि. २६/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

श्री.विजय चव्हाण यांचे वाहन क्रमांक एम.एच.१४/ऐ.ई.२५०८ या वाहनाचे दि.१/६/०८ ते दि.३१/६/०९ व सुवर्णा टुर्स ॲण्ड टॅव्हल्स यांचे वाहन क्र.एम.एच.१४/ऐ.एम.३९३५ या वाहनाचे दि.१/२/०८ ते दि.३१/१२/०८ या कालावधीतील बिलाची अदायगी व मध्यवर्ती औषध भांडार विभागाकरिता कार्यालयीन कामकाजा साठी श्री.संजय शिनगारे यांचे वाहन क्र.एम.एच.१२/डि.टि. ४०५८ हे वाहन र.रू.६००/- प्रतिदिनी ८० किलोमिटर मर्यादे पर्यंत व ८० किलोमिटरच्या पुढे प्रति किलोमिटर र.रू.४=६० पैसे या दराने एप्रिल २००९ ते मार्च २०१० पर्यंत मुदतवाढ व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४६ विषय क्रमांक :- २५
दिनांक - ३.११.२००९ विभाग - संगणक
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/०८/कावि/४९३/०९
दि. २७/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

E-mail Package चे पुढील एक वर्ष कालावधी करिता (दि.२७/९/२००९ ते २६/९/२०१०) नुतनीकरणाचे कामकाज निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने Tech ९ Services यांचे मार्फत करणेत आलेले असल्याने सदर कामकाजा साठी येणाऱ्या र.रू.७९,४१६/- [र.रू.एकोणऐंशी हजार चारशे सोळा] (Including Service Tax १०.३ %) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४७ विषय क्रमांक :- २६
दिनांक - ३.११.२००९ विभाग - पाणीपुरवठा
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक - मा.सुरदास गायकवाड
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/१५६०/०९दि. २७/१०/०९
विषय :- निविदा नोटीस क्रमांक - ३/२-२००९-१० (E - Tendering)मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक २६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४८ विषय क्रमांक :- २७
दिनांक - ३.११.२००९ विभाग - पाणीपुरवठा
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक - मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/७७३/०९दि.२७/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

JNNURM प्रकल्पातील पाणीपुरवठा व जलनिःसारणाचे कामांची निविदा नोटीस प्रसिध्दी साठी जाहिरात खर्चापोटी दै.डी.एन.ए. यांना र.रू.३,११,५२०/- [र.रू.तीन लाख अकरा हजार पाचशे वीस] व दै.लोकमत यांना र.रू.२,२८,८००/- [र.रू.दोन लाख अठ्ठावीस हजार आठशे] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५४९ विषय क्रमांक :- २८
दिनांक - ३.११.२००९ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक - मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/०४/कावि/४६१/०९ दि. २७/१०/२००९
विषय :- पास्को एनवायरमेंटल सोलुशन प्रा.लि.यांनी पुरवठा केलेल्या नॉनक्लोरोनेट प्लास्टिक बॅगचे बिल अदायगी बाबत...

विषय क्रमांक २८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५५० विषय क्रमांक :- २९
दिनांक - ३.११.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक - मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.बप्र/वि/११०३/०९दि.२७/१०/२००९

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वॉर्ड क्र.५९ उर्वरित वाल्हेकरवाडी परिसरातील म.रा.वि.वि.कं. चे लघुदाब वाहिनीचे खांब व तारा हलविणेकामी वीजपर्यवेक्षण शुल्क र.रू.३५,५६०/- [र.रू.पस्तीस हजार पाचशे साठ] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- ९५५१ विषय क्रमांक :- ३०
दिनांक - ३.११.२००९ विभाग - ब प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक - मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/११०४/०९दि.२६/१०/२००९

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे..

आनंदनगर झोपडपट्टी, चिंचवड येथे स्ट्रीट लाईटकरिता ट्रान्सफॉर्मर बसविणेचे कामाचे विजपर्यवेक्षण शुल्क र.रू. ३,०००/- [र.रू.तीन हजार] म.रा.वि.वि.कं.लि.यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५२ विषय क्रमांक :- ३१
दिनांक - ०३.११.२००९ विभाग -आकाशचिन्ह व परवाना
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/३/कावि/१७०/०९दि.२७/१०/०९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत नाशिक फाटा चौक, पुणे-मुंबई हायवे येथील सद्यस्थितीत असलेल्या जागेवरील आकाशचिन्ह जाहिराती प्रसिध्दीकामी ई-टेंडरींग व्दारे आलेल्या निविदांमध्ये मे.बिग इंडिया ग्रुप, प्राधिकरण यांनी निविदामध्ये दिलेला प्रती चौ.फुट प्रती महा दर र.रू.२६/- स्विकृत करणेस व कामाचा करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. उपरोक्त निविदेमध्ये मे.बिग इंडिया ग्रुप या जाहिरात संस्थेतर्फे प्रति चौरस फुट रुपये २६/- हा म.न.पा.च्या अपेक्षेपेक्षा जास्त दर आल्याने तसेच म.न.पा.चा पुढील आर्थिक फायदा लक्षात घेता पुढील चौकात प्रति चौरस फुटास रु.२०/- प्रमाणे मान्यता देणेत येत आहे. तसेच टेंडरमधील दिलेल्या कालावधीत सदर जाहिरात संस्थेस जाहिरात फलक उभारुन त्याचा खर्च सुध्दा काढता येणार नाही. या सर्व गोष्टींचा विचार करुन पुढील चौकात जाहिरात फलक उभारण्यास तसेच टेंडरमधील कालावधी १० वर्षांचा करण्यास मान्यता देणेत येत आहे. १) पिंपरी आंबेडकर पुतळा चौक - २,००० चौ.फुट, २) फिनोलेक्स चौक - २,००० चौरस फुट, ३) चिंचवड - २,००० चौरस फुट, ४) चिंचवड स्टेशन - २,००० चौरस फुट, ५) आकुर्डी - २,००० चौरस फुट, ६) भक्ती-शक्ती - २,००० चौरस फुट, ७) चाफेकर चौक - २,००० चौरस फुट, ८) डांगे चौक - १,००० चौरस फुट, ९) वाकड चौक - २,००० चौरस फुट, या ठिकाणी जाहिरात फलक उभारणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५३ विषय क्रमांक :- ३२
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - वैद्यकिय
सुचक- मा.सुरेखा साळुंखे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/६/कावि/६१८/०९दि.०७/०९/०९
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील जैविक विविधता सर्वेक्षण, परिक्षण व संवर्धन, पवना व इंद्रायणी या नद्यांमधील निसर्ग विज्ञान अभ्यास, खाणी व ओसाड जमिनींचे पुनर्स्थापना/सुशोभिकरण करणेकामी Science & Technology Park, पुणे विद्यापीठ,पुणे यांना अदा करण्यात आलेल्या आगाऊ रकमांचे समायोजन करणेबाबत...

विषय क्रमांक ३२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५४ विषय क्रमांक :- ३३
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - वैद्यकीय
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१०/कावि/७३/०९दि.२८/१०/०९
विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रोटरी क्लब, एस.एन.बी.पी. स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पिंपरी चिंचवड सायन्स कॉंग्रेस २००९ झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत...

विषय क्रमांक ३३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५५ विषय क्रमांक :- ३४
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - वैद्यकीय
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/६/कावि/६९४/०९दि.२८/१०/०९
विषय - पर्यावरण विषयक जनजागृती होणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील शाळांमध्ये पर्यावरण या विषयावर शालेय प्रश्नमंजुषा घेणेबाबत आणि येणाऱ्या खर्चास मान्यता घेणेबाबत...

विषय क्रमांक ३४ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५६ विषय क्रमांक :- ३५
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.उदयान/५/कावि/२१८/०९ दि.२७/१०/०९
विषय - ई-निविदा नोटीस क्रमांक -१ (१-अ) /२००९-१० मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५७ विषय क्रमांक :- ३६
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - उद्यान/वृक्षसंवर्धन
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/१/कावि/२१७/०९दि.२७/१०/०९
विषय -ई-निविदा नोटीस क्रमांक -१ (१-क) /२००९-१० मधील कामाचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक ३६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५८ विषय क्रमांक :- ३७
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - नगररचना व विकास
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१अ/२८८/०९ दि.२६/१०/२००९.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे आकुर्डी येथील सि.स.नं.४१८३ या मिळकतीतील रस्ता रूंदीने बाधित क्षेत्राचे मुल्यांकन र.रू.५४,६७५/- इतक्या रकमेस खाजगी वाटाघाटी समितीने दि.२५/६/०९ च्या बैठकीत मान्यता दिलेली असून सदर मुल्यांकनाची र.रू.५४,६७५/- श्री.एम.पी. सुतार यांना कळविण्यात आलेली असून श्री.एम.पी.सुतार यांनी सदर रक्कम मान्य असल्याचे कळविले असल्याने सदर रकमेस तसेच सदर प्रकरणी करावयाच्या खरेदी खताच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५५९ विषय क्रमांक :- ३८
दिनांक - ०३.११.२००९ विभाग -नगररचना व विकास
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.सुरेखा साळुंखे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/१ब/२९९/०९ दि.२६/१०/२००९.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाढीव हद्दीच्या भागश मंजूर विकास योजनेतील मौजे पुनावळे येथील आ.क्र.४/७४ए, मैलाशुध्दीकरण प्रकल्प या आरक्षणा खालील जागेचा विकास जेएनयुआरएम अंतर्गत करण्यासाठी सदर जागा मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे मौजे पुनावळे येथील आ.क्र.४/६६, इडब्ल्यूएस (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे) या प्रयोजनासाठीची जागाही मनपाच्या ताब्यात घेणे गरजेचे आहे. सदर आरक्षणाखालील जागा ताब्यात घेताना सदर जागांच्या १२.०० मी.रूंद पोचरस्त्यांखालील जागाही ताब्यात घेणे आवश्यक आहे सदर आरक्षित क्षेत्राच्या भूसंपादनाच्या खर्चास (भूसंपादन अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६०　　　　　　　　विषय क्रमांक :- ३९
दिनांक - ०३.११.२००९　　　　　　　　विभाग - विद्युत
सुचक- मा.राजेश पिल्ले　　　　　　　　अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुंपुर,वायसीएमएच/३७२/०९ दि.२८/१०/२००९.
विषय - सन २००९-१० चे अंदाजपत्रकामधील तरतूद वर्ग करणेबाबत (विद्युत विभागाअंतर्गत)

विषय क्रमांक ३९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६१　　　　　　　　विषय क्रमांक :- ४०
दिनांक - ०३.११.२००९　　　　　　　　विभाग - विद्युत ब प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम　　　　　　　　अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/१११२/०९ दि.२९/१०/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड येथील पवनानगर येथील बॅडमिंटन हॉलच्या विद्युतीकरणाची दुरुस्ती करणे या संबंधीत कामाकरिता प्राप्त कोटेशन धारकापैकी लघुत्तम दरधारक मे.विमलाई इले.कार्पो. यांचेकडून सदर तातडीचे काम अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा १.२ % कमी दराने करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

(अंदाजपत्रकीय र.रू.४९,९५७/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६२　　　　　　　　विषय क्रमांक :- ४१
दिनांक - ०३.११.२००९　　　　　　　　विभाग-जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक- मा.आशा सुर्यवंशी　　　　　　　　अनुमोदक- मा.प्रशांत शितोळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जस/६/कावि/२२०/०९दि.२९/१०/०९
विषय - मनपाची डॉक्युमेंटरी फिल्म तयार करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत...

विषय क्रमांक ४१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६३　　　　　　　　विषय क्रमांक :- ४२
दिनांक - ०३.११.२००९　　　　　　　　विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.जितेंद्र ननावरे　　　　　　　　अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/आ/२/कावि/८७४/०९ दि.२८/१०/२००९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या अ प्रभाग क्षेत्रात कुंडीविरहीत वॉर्ड योजने अंतर्गत घरोघरचा कचरा गोळा करणे कामकाजासाठी नि.नो.क्र. ३/२००७-०८ व त्याअनुषंगाने ठराव क्र.५६४० दि.२३/७/२००८ अन्वये नेमण्यात आलेल्या प्रस्तावात नमुद ठेकेदारांचे कामास

दि.१/११/२००९ पासून एक वर्ष कालावधी साठी मुदतवाढ देणेस, त्यांच्याशी याकामी करारनामा करणेस व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेची मागणी करणेत आली असली तरी मे.आर.जी.मंगळवेढेकर,बी.व्ही. गायकवाड, सुयोग कन्स्ट्रक्शन, जय गणेश एन्टरप्रायजेस,तावरे कन्स्ट्रक्शन यांचा पुर्वानुभव विचारात घेता व मनपाचे आर्थिक हित विचारात घेता प्रस्तावातील दराने व अटी शर्तीनुसार सदरची कामे त्यांस पुढील दोन वर्षे कालावधीकरीता देणेस व त्याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- ९५६४ विषय क्रमांक :- ४३
दिनांक - ०३.११.२००९ विभाग - स्थापत्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कावि/२१५५/२००९ दि.३/११/०९
विषय :- स्थापत्य उद्यान विभागातील सन २००९-१० चे अंदाजपत्रकातील स्थापत्य २(अ) उद्याने या लेखाशिर्षावरील तरतुद वर्ग करणेबाबत...

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

स्थापत्य उद्यान विभागाची सन २००९-१० या आर्थिक वर्षात स्थापत्य २(अ) उद्याने या लेखाशिर्षावर र.रु.१०,००,४०,०००/- इतकी तरतुद आहे. सदर लेखाशिर्षांतर्गत एकुण १२६ कामे आहेत. यापैकी २५ कामांसाठी तरतुद कमी पडत आहे. तरी सदर २५ कामांसाठी र.रु.१,९६,५०,०००/- ची वाढ करावी लागणार आहे. त्यासाठी या लेखाशिर्षांतर्गतच ३४ कामांवरुन र.रु.१,९६,५०,०००/- ची तरतुदीमध्ये घट करावी लागणार आहे. सदर अंदाजपत्रकात शुन्य तरतुद असलेली ६ कामे असून त्यासाठी र.रु.१२,२१,०००/- इतकी तरतुद करावी लागणार आहे. याकामी एकुण ४ कामांवरील र.रु.१२,२१,०००/- घट करणे आवश्यक आहे. सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्याच्या मा.आयुक्त यांच्या मागणीनुसार त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६५ विषय क्रमांक :- ४४
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या संगणक विभागामार्फत चार नागरी सुविधा केंद्र / आधार केंद्र उभारणेचे आदेश शासनाच्या ८/८/२००८ चे शासन निर्णयानुसार देण्यात आले होते. सदर केंद्रासाठी शासनाकडून मनपास २०,०००००/- इतके प्राप्त झाले आहेत. नागरी सुविधा केंद्र/आधार केंद्र यांचा एकत्रित विचार करुन प्रत्येक प्रभागासाठी एक याप्रमाणे चार प्रभागासाठी चार केंद्र उभारणेसाठी प्रत्येकी र.रु.४,९८,०००/- प्रमाणे

१९,९२,०००/- एवढी येत आहे. सदर नागरी सुविधा केंद्राची निकड लक्षात घेता व शासनाचे आदेशानुसार लवकरात लवकर केंद्राची कामे पूर्ण करुन वापरात आणणेबाबत सुचना असलेने मा.आयुक्त यांचे दि.१६/०२/०९ चे मान्य प्रस्तावानुसार काम चालु करुन पुर्ण करणेत आले आहे. सदर कामासाठी शासनामार्फत मनपा कोषागारात र.रु.२०,०००००/- (वीस लक्ष) एवढी रक्कम जमा झाली आहे. सदर कामासाठी मनपाचे अंदाजपत्रकीय आर्थिक तरतूदीमधुन कोणतीही रक्कम खर्च होणार नसून शासनामार्फत मिळालेल्या र.रु.२०,०००००/- रकमेतूनच खर्च होणार आहे. आचारसंहिता असलेने कामाची निकड लक्षात घेवून मा.आयुक्त यांचे मान्य प्रस्तावाप्रमाणे काम करुन घेण्यात आले आहे. तरी सदर शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानामधुन उपरोक्त कामासाठी र.रु.२०,०००००/- या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६६ विषय क्रमांक :- ४५

दिनांक - ०३.११.२००९

सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे

संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

प्रती वर्षीप्रमाणे यंदाही श्रीमान मोरया गोसावी यांचा संजीवन समाधी सोहळा दिनांक ४/१२/२००९ ते ७/१२/२००९ या कालावधीत संपन्न होणार आहे.तसेच आकुर्डी येथील खंडोबा महाराज महोत्सव संपन्न होणार आहे. त्यासाठी मनपातर्फे प्रती वर्षीप्रमाणे, कार्यक्रमासाठी मंडप,व्यासपीठ (स्टेज),विद्युत पुरवठा व रोषणाई, ध्वनीवर्धक,फुलांच्या सजावटीसह आरोग्यविषयक सुविधा, प्रसाद करणेसाठी छोटा मंडप,पाणीपुरवठा,अग्नीशमन व्यवस्था तसेच अनुषंगीक व्यवस्था व खाली नमूद केलेली व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) मुख्य मंडप २०० फूट X १५० फूट (यात्री निवासच्या भिंतीपर्यंत)
२) मुख्य मंडपात अंदाजे ३० फूट X २० फूट या मापाचे स्टेज/व्यासपीठ (किमान ३ फूट उंच)
३) स्टेजचे डावे बाजूस २० फूट X २० फूट मापाचा अभ्यागत कक्ष व उजवे बाजूस २० फूट X २० फूट मापाची कोठी
४) महाप्रसाद तयार करणेसाठी मंडपाला लागूनच पत्र्याचे बंदीस्त स्वयंपाकघर
५) संपूर्ण महोत्सव कालावधीत पिण्याच्या पाण्याची सोय
६) अग्नीशमन व्यवस्था व परिसर स्वच्छता

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६७ विषय क्रमांक :- ४६
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.जगदीश शेट्टी,मा.राजेश पिल्ले यांचा प्रस्ताव...

मनपा शाळेतील मानधनावरील शिपायांस र.रु.२०००/- मानधनाऐवजी द.म. र.रु.४,०००/- मानधन अदा करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६८ विषय क्रमांक :- ४७
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.रामदास कुंभार,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

भोसरी स.नं.६९५ मधील बाह्यरुग्ण इमारतीचे विस्तारीकरण करणे (निविदा नोटीस क्र.१३/२४-२००८-०९) या कामाची येथे आवश्यकता नसलेने सदरचे काम हे वॉर्ड क्र.११ अंतर्गत चोविसावाडी येथे व्यायामशाळा बांधणेची आवश्यकता आहे. तरी सदरचे काम चोविसावाडी येथे व्यायामशाळा बांधणे याठिकाणी करणेच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५६९ विषय क्रमांक :- ४८
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.भाऊसाहेब सुपे अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.भाऊसाहेब सुपे,मा.जितेंद्र ननावरे यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तींस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | नांव | पद | र.रु. |
|---|---|---|---|
| १. | गीता ज्ञानेश्वर साकोरे | कॉम्प्युटर ऑपरेटर (ब प्रभाग विद्युत) | ५,०००/- |
| २. | कोमल बापूसाहेब भगत | कॉम्प्युटर ऑपरेटर | ५,०००/- |
| ३. | अनीता नागनाथ शितोळे | कॉम्प्युटर ऑपरेटर | ५,०००/- |
| ४. | प्रियांका सुरेश आल्हाट | कॉम्प्युटर ऑपरेटर | ५,०००/- |
| ५. | सुषमा प्रभाकर चौधरी | कॉम्प्युटर ऑपरेटर | ५,०००/- |
| ६. | डॉ.अशोक अग्रवाल | वैद्यकीय अधिकारी | १२,०००/- |
| ७. | सुरेखा रामकृष्ण रनित | समुह संघटक | ७,०००/- |
| ८. | भाऊसाहेब व्यंकट खैरे | क्रीडा शिक्षक | ८,०००/- |
| ९. | डॉ.ज्योती एस.लोंढे (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | १२,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | डॉ.सारीका ज्ञानेश्वर पदमाळे | दंतरोगतज्ञ | ८,०००/- |
| ११. | स्वाती मधुकर जगदाळे | योगशिक्षक | ५,०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७० विषय क्रमांक :- ४९
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.जगदीश शेट्टी, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत घटक योजना क्र.८ अन्वये बचत गटास प्रकल्प खर्चाच्या ५०% अथवा जास्तीत जास्त र.रु.२,५०,०००/- व्यवसायासाठी अनुदान देण्याची योजना आहे. सदर योजनेअंतर्गत सुनेत्रा महिला बचत गट,तानाजीनगर,चिंचवडगांव,पुणे-३३ या बचत गटास बँक ऑफ इंडिया,पिंपरी शाखेने र.रु.५,००,०००/- (रक्कम रु.पाच लाख फक्त) कर्ज मंजूर केले आहे. तरी सुनेत्रा महिला बचत गट, तानाजीनगर,चिंचवडगांव, यांना प्रकल्प खर्चाच्या ५०% प्रमाणे र.रु.२,५०,०००/- (रक्कम रु.अडीच लाख फक्त) अदा करण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७१ विषय क्रमांक :- ५०
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.नितीन ओव्हाळ, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्री व जनावरे पकडून योग्य कार्यवाही करण्याचे काम मे.स्मार्ट मॅनेजमेंट ॲन्ड सर्व्हिसेस यांना किमान वेतन दराने तीन वर्षे कालावधीसाठी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७२ विषय क्रमांक :- ५१
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.जितेंद्र ननावरे, मा.भाऊसाहेब सुपे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड येथील काळभोरनगर एस.टी.बस स्थानकाच्या परिसरात समता गणेशोत्सव मंडळामार्फत श्री.हनुमानाची देखणी व सुबक ४८ फुटी भव्य मुर्ती उभारलेली आहे. या परीसरामध्ये एवढी मोठी हनुमान मुर्ती कोठेही नसल्यामुळे पिंपरी चिंचवड शहराचे एक मानबिंदू झालेला आहे व शहराच्या सौंदर्यीकरणात भर

टाकलेली आहे. ही मुर्ती रात्री सुद्धा नागरीकांना पाहता यावी या दृष्टीने या मुर्तीवर स्पॉटलाईटद्वारे रोषणाई करणे गरजेचे आहे. ज्याप्रमाणे निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्पाची विद्युत रोषणाई केली जाते त्याच धर्तीवर काळभोरनगर येथील ४८ फुटी भव्य मुर्तीला दोन्ही बाजूकडून स्पॉटलाईटद्वारे कायमस्वरुपी विद्युत रोषणाई महापालिकेमार्फत करणेस व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७३ विषय क्रमांक :- ५२

दिनांक - ०३.११.२००९

सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ

संदर्भ:-मा.जगदीश शेट्टी,मा.नितीन ओव्हाळ यांचा प्रस्ताव...

लिंक रोड येथील मुस्लीम दफन भूमी देखभाल,संरक्षण व चालन करणेचे काम जामीया दासम फल्हा या संस्थेकडून किमान वेतन दराने पुढील एक वर्ष कालावधीत स्वयंसेवक उपलब्ध करुन घेऊन त्यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७४ विषय क्रमांक :- ५३

दिनांक - ०३.११.२००९ विभाग - सार्वजनिक वाचनालय

सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.गणेश भोंडवे

संदर्भ:-मा.अतिरिक्त आयुक्त यांचे जावक क्र.सा.वा/६/कावि/०२/०९ दि.३१/१०/०९

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.रसिक साहित्य प्रा.लि. पुणे यांचेकडून १८ सार्वजनिक वाचनालयांकरीता एकूण ९६० दिवाळी अंक थेट पद्धतीने खरेदी करणेकामी अंदाजे र.रु.७०,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याने थेट पद्धतीने दिवाळी अंक खरेदीकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- ९५७५ विषय क्रमांक :- ५४
दिनांक - ०३.११.२००९
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.गणेश भोंडवे
संदर्भ:-मा.प्रशांत शितोळे, मा.गणेश भोंडवे यांचा प्रस्ताव...

मनपाच्या नागरवस्ती विकास योजना या विभागांतर्गत महिला बालकल्याण विभागामध्ये अनेक योजना राबविल्या जातात. या योजना राबविणेकामी मे.प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटी या संस्थेस या विभागाशी संबंधित असणाऱ्या योजना नियमानुसार राबविणेकामी ५ वर्षांसाठी नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१०६७/२००९
दिनांक - ०५/११/२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## प्रपत्र अ

[मा.स्थायी समिती ठ.क्र.९५२८ दि.३/११/०९ चे लगत]

| अ.क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र.व अ.क्र | सन २००९ - १० तरतुद | सन २००९-१० ची सुधारीत तरतुद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा हद्दीतील पुणे आळंदी रस्त्याचे विकास आराखडयानुसार रुंदीकरण करणे | स्थापत्य भांडवली खर्च पथ -ब) डांबरी रस्ते | २८२/१८ | ४०००००० | ७६००००० | ३६००००० | | पान क्र.२७७/२५ वरुन व पान क्र. २८८/१२ वरुन वर्ग करणेत यावी. |
| २ | वॉर्ड क्र.१२ च-होली पठारे मळा पुर्व दाभाडे वस्ती, कोतवाल वस्ती, फुलेवस्ती व इतर ठिकाणे खडीकरण करणे | स्थापत्य भांडवली खर्च पथ - अ) डांबरी रस्ते | २७७/२५ | १२८०३००० | १०३२००० | ० | २०००००० | पान क्र.२८२/२८ वर वर्ग करणेत यावी. |
| ३ | वॉर्ड क्र.१३ दिघी येथील विकास आराखडयानुसार १५ मी रुंदीच्या रस्त्यावर शिवनगरी जवळील नाल्यावर सी.डी.वर्क बांधणे | पुल व प्रकल्प | २८८/१२ | ७६८२००० | ६०८२००० | ० | १६००००० | पान क्र.२८२/२८ वर वर्ग करणेत यावी. |

सही/-
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका